**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५3 विषयाबाबतचे निर्णय**
**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १७८** **दिनांक – १५/०७/२०२५**
**विभाग – नगर रचना विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय –अहिल्यानगर शहराच्या वाढीव** हद्दीची (दुसरी सुधांराति) मधील मंजुर विकास योजना, अहिल्यानगर ( वाढीव हद्द ) नगररचना योजना अहिल्यानगर सावेडी स. ३१६, ३१७, ३१९, ३२० या जागेच्या मंजुर रेखांकनातील विकास योजना रस्त्याच्या स्थान बदल ( रि-अरेंजमेंट ) करणेसाठी कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणे बाबत .

--**--

**ठराव –** अहिल्यानगर शहराचा वाढीव हद्दीची (दुसरी सुधांराति) विकास योजना शासनाने अधिसुचना क्र., १६११/२/८९/ प्र.क्र.२५०/२०११/नवि/०९ दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजीच्या अधिसूचना नेव्दारे मंजुर केलेली आहे .

उपरोक्त मंजुर विकास योजनेत खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे फेरबदल प्रस्तावित केलेले आहे .

| अ.क्र. | मजुर विकास योजना , अहिल्यानगर वाढीव हद्द प्रस्ताव | नियोजित फेरा बदल प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | अहिल्यानगर सावेडी स. ३१६, ३१७, ३१९, ३२० या जागेच्या मंजुर रेखांकनातील १८.०० मीटर विकास योजना रस्ता हा अंतिम मंजुर रेखांकन जा.क्र. टि . पी . ७५६५ दिनांक ०३/११/२०१६ मधील भुखंड क्र. १,२,६ यांच्या मधुन पुढे ३०.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्या (वडगांव रोड ) ला मिळत आहे. तिरक्या रेषेने दर्शविल्यानुसार | अहिल्यानगर सावेडी ३१६, ३१७,३१९, ३२० या जागेच्या मंजुर रेखांकनातील १८.०० मीटर विकास योजना रस्ता भुखंड क्र . १,६ व खुल्या जागेच्या उत्तर दिशने आराख्यात सरळ रेषेत , (पुर्व – पश्चिम )आराखड्यात दर्शविल्यानुसार प्रस्तावित आहे. |

उक्त नमुद फेरबदलबाबत महानगरपलिकेने खालील प्रमाणे वैधानिक कार्यवाही पार पाडलेली आहे.

1 ) प्रथमिक  महासभेचा प्रशासन ठराव क्र. १४० दिनांक २४/०३/२०२५



2 ) प्रस्ताविक फेरबदलाबाबत जाहिर सुचनेचे प्रसिध्दीकरण

अ) नगर टाईम्स  वर्तमान पत्र दिनांक ३०/०५/२०२५ व सिटी वॉच वर्तमान पत्र दिनांक ३०/०५/२०२५.

ब ) शासन राजपत्रात प्रसिध्दी दिनांक २९ जुन २०२५. उक्त प्रसिध्दी केलेल्या  फेरबदल प्रस्तावावर तीस (३०) दिवसच्या विहीत मुदतीत कोणतीही हरकत आलेली नाही . त्यामुळे सावेडी स. ३१६, ३१७, ३१९, ३२० या जागेच्या मंजुर रेखांकनातुन जाण-या १८.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे स्थान बदल (रि — अरेंजमेंट ) करणेसाठी कलम ३७ अन्वये फेरबदल करणे बाबतची वैधानिक कार्यवाही पुर्ण झालेली असुन सदर फेरबदलाबाबतचा अंतिम प्रस्ताव मा.शासनास सादर करणेस प्रशासक  सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे

---

**निर्णय**   -  महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५3 विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक — १७९** **दिनांक — १५/०७/२०२५**

**विभाग — बाधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय —** अहिल्यानगर महानगरपालिका ई.नि.क्र.१०३७५०४ प्र. क्र. ०४ मधील मिस्कीननगर अंतर्गत चावला घर ते देवळालीकर घरापर्यंत रस्ता विकसीत करणे. (चावला ते खोपेश्वर मंदिर) काम रद्द करणे बाबत.

--**--

**ठराव --** विभागाने प्रस्तावित केलेनुसार ई. नि.क्र. १०३७५०४२० प्र.क्र. ०४ मधील मिस्कीननगर अंतर्गत बावला घर ते देवळालीकर घरापर्यत रस्ता विकसित करणे. ( चावला ते खोपेश्वर मंदिर ) या कामास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे सन२०२३-२४ अंतर्गत संदर्भिय पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी यांचेकडील प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर प्रशासकीय मान्यतेनुसार सदर कामाची ई निविदा क्र. १०३७५०४-२० दि. १६/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत येऊन दि. १६/०३/२०२४ ते २६/०३/२०२४ अखेर मागविण्यांत आलेली होती. त्यामध्ये श्री.महेश दिपक व्यापारी व श्री.सचिन बाबासाहेब सापते यांनी निविदा दाखल केलेल्या आहेत सदर निविदा तांत्रिक छाननी समिती समोर सादर केली असता दोन्ही निविदे धारकांची कागदपत्रे अपूर्ण असलेने इकडील सा. बांध. वि. जा.क्र. ३०० दि. ०१/०५/२०२४ अन्वये ५ दिवसात अपूर्ण कागदपत्राची पुर्तता करणेस कळविले होते. त्यानुसार त्यांनी अपुर्ण कागदपत्रे सादर केली नुसार छाननी समितीच्या दि. २५/०६/२०२४ चे इतिवृत्त नुसार व्यापारी लिफाफा उघडणेत आला असता श्री.महेश दिपक व्यापारी यांनी ४.०० % जादा दराची निविदा दाखल केलेली असून श्री.सचिन बाबासाहेब सापते यांनी सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने निविदा दाखल केलेली आहे.

तथापी दरम्यानच्या काळात मिस्कीन नगर मध्ये ई नि क्र. १०३२२७७ प्र. क्र. ४ मधील चूग घर ते आशा हाऊसिंग रस्ता कॉक्रीटीकरण करणेचे काम महाराष्ट्रसुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) २०२३-२४ अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरणाचे कामामध्ये कामाचा वाव शिल्लक असलेने उक्त कामाच्या ठिकाणी ही रस्ता कॉक्रीटीकरणाचे काम करणेत आलेले आहे.

तरी उक्त ठिकाणी सद्यस्थितीत काम झालेले असलेने नागरी स्थनिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे सन २०२३-२४ अंतर्गत ई नि क्र. १०३७५०४-२० प्र.क्र. ०४ मधील मिस्कीननगर अंतर्गत चावला घर ते देवळालीकर घरापर्यंत रस्ता विकसित करणे. ( चावला ते खोपेश्वर मंदिर ) हे काम रद्द करणेस व श्री.महेश दिपक व्यापारी व श्री.सचिन बाबासाहेब सापते यांना तसे कळविणेस व त्यांनी निविदा दाखल करतेवेळी भरलेली बयाण रक्कम अदा करणेस तसेच सदर कामाची अखर्चीत रक्कम रू. २७,९७,६१६/- मा.शासन खाती जमा करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५3 विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक – १८०** **दिनांक – १५/०७/२०२५**

**विभाग – मार्केट विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय –** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमधील रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी झोन निहाय फेर निविदा मागविणे बाबत .

--**--

**ठराव –** विभागाने प्रस्तावित केलेनुसार मनपा हद्दीमधील रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी बाबत मनपा मार्फत सन २०१९-२०२० ते सन २०२४-२०२५ पर्यंत खालील प्रमाणे प्रत्यक्ष वसुल करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | सन | प्रत्यक्ष वसुली रक्कम |
|---|---|---|
| १ | २०१९-२०२० | १८७२९५०/- |
| २ | २०२०-२०२१ | ३७४११०/- |
| ३ | २०२१-२०२२ | ५६७१९०/- |
| ४ | २०२२-२०२३ | १११२१६०/- |
| ५ | २०२३-२०२४ | १३४४९८०/- |
| ६ | दि . २८-०२-२०२५ अखेर | ७५३९१०/- |

मा. स्थायी समिती ठराव क्र. १३३ दि. १-११-२०२१ अन्वये रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली ई-निविदा क्र.७०४९९५८.१ मध्ये श्री .छत्रपती शिवाजी स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था सिडको, ता-जि – नांदेड यांनी देकार रक्कम रू. ४६,९०,२५०/- देण्याचे मान्य केले असल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार एक वर्षे कालावधीकरिता सदर संस्थेस ठेका देणेबाबत ठराव पारित झालेला होता . मात्र ठेकेदाराने ठेका मध्येच सोडल्याने ठेकेदाराची अनामत व बयाणा रक्कम जप्त करून सदर ठेकेदार विरोधात कोतवाली पोलीस स्टेशन अहमदनगर येथे FIR No. 0750 दि. १०-७-२०२३ अन्वये थकीत रक्कम वसुलीकरिता गुन्हा दाखल केलेला आहे.

तसेच मार्केट विभागाकडुन रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करणेबाबत नव्याने निविदा रू ५२,२७,२००/- प्रसिध्द करण्यात आलेली होती मात्र सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पाच वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आली होती

| अ.क्र. | निविदा क्र. | प्राप्त निविदा |
|---|---|---|
| १ | ANMC-948180-1 | 2 |
| २ | ANMC-959934-1 | 2 |
| ३ | ANMC-1004115-1 | 3 |
| ४ | ANMC-1081623-1 | 3 |
| ५ | ANMC-1111725-1 | 2 |

रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीची वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पाच वेळा निविदा प्रसिध्द केली असता ई-निविदा क्र. ANMC-1111725-1 मध्ये ) रयान एन्टनरप्राईजेस, अबंरनाथ 2) वंशिका एन्टनरप्राईजेस, भिंगार, अहिल्यानगर यांची निविदा प्राप्त झालेली आहे उपरोक्त निविदा मनपाने निश्‍चित केलेल्या निविदेतील देकार रकमेच्या ५० % पेक्षाही कमी वरील ठेकेदार यांना दि. २०-१२-२०२४ रोजी मा. आयुक्त सो यांच्या समोर वाटाघाटी / तडजोड करणे साठी बैठक आयोजित केली होती त्यांनी रू.१८.००,०००/- इतक्याने ठेका दिल्यास आम्ही रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करण्यास तयारी दर्शविण्यात आली आहे मात्र निविदाधारक यांनी मनपाचे देकार रक्कम जास्त असल्याने ठेका घेण्यास नकार दिलेला आहे त्यामुळे सदरची नव्याने निविदा रद्द करण्यात आलेली आहे.

तदनंतर मा. प्रशासक ठराव क्र. १३५ दिनांक १८-०३-२०२५ अन्वये झोन निहाय Expression of intrest ( स्वारस्य अभिव्यक्ती ) ई-निविदा क्र. ANMC-1164210-1, ANMC-1164242-1 व ANMC- 1164259-1 मागविण्यात आलेल्या आहेत. मात्र सदर निविदेमधील दर हे अत्यंत कमी असल्याने सदरची निविदा रद्द करून फेर निविदा मागविणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता . सदर प्रस्तावास मा. आयुक्त तथा प्रशासन यांनी मान्यता देवुन सदरचा विषय मा. स्थायी समिती समोर घेण्यात यावा, असे आदेशित केलेले होते .सदर आदेशानुसार मा. स्थायी समिती समोर सदरचा विषय घेवुन फेर निविदा काढणे बाबत वरील संदर्भानुसार ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

विभागाकडे रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करीता केवळ ५ कर्मचारी उपलब्ध असुन ते सर्व कर्मचारी हे वर्ग -४ मधील आहेत . व दर मंगळवारी सर्जेपुरा येथे मंगळवार बाजार भरत असतो . त्यावेळेस वर्ग -४ मधील १ कर्मचा-याकडुन कामकाज करून घेण्यात येते. वरील वर्ग -४ मधील एका कर्मचारी यांचे अदाजित वेतन रू. ३० ते ४० हजार इतके आहे. त्यानुसार दर वर्षी एका कर्मचा-यावर रू.४,८०,०००/- इतका वेतनापोटी खर्च होतो . असे पाच कर्मचारी मिळुन दर वर्षास रू.२४,००,०००/- इतका खर्च होतो . तसेच रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करीता लागणारी स्टशनरीसाठी म्हणजे पुस्तक,कार्बन, व तदनुषंगिक इतर खर्चासाठी अंदाजे रू.२,४०,०००/- इतका खर्च येत आहे. असा एकुण खर्च रू. २६,४०,०००/- इतका खर्च होतो . व त्याच्याकडुन अंदाजे दर वर्षी रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी रू. १० ते १५ लाख रूपयेची वसुली होत आहे . त्यामुळे नव्याने निविदा काढणे आवश्यक आहे.

मा. प्रशासक ठराव क्र. ५१३ दिनांक २४-०६-२०२५अन्वये रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी वसुलीची निविदा प्रसिध्द करणे झाल्यास दरवर्षी मनपा कर्मचा-यामार्फत संपुर्ण शहराच्या रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी रू.१०ते१५लाख इतकी रक्कम वसुल होते. सदरची रक्कम विचारात घेवुन रू.१०% अधिक रक्कम वाढवुन १८% जी .एस. टी. सहीत चार ही प्रभागची पुढील प्रमाणे निविदा रक्क्म होत आहे झोन क्र.१ साठी रू. ४,२०,०००+ १८% जी.एस.टी. झोन क्र. २ व ३ साठी ८,४०,०००/- + १८% जी.एस.टी.,
व झोन क्र. ४ साठी ४,२०,००० + १८% जी. एस. टी. अशी स्वतंत्र तीन स्वतंत्र ई-निविदा मागविणे योग्य होईल, असे मत आहे.

तरी वरील प्रमाणे प्रभाग समिती क्र.१ करिता स्वतंत्र निविदा, प्रभाग समिती क्र.२ व ३ करिता स्वतंत्र निविदा व प्रभाग समिती क्र.४ करिता स्वतंत्र निविदा मागविल्यास स्पर्धात्मक दृष्टया मनपाच्या प्रस्तावास योग्य प्रतिसाद मिळेल व रस्ता मांडणी फी व स्लॉटर
फी अनुषंगाने होणा-या वसुलीमुळे प्रतिवर्ष उत्पनात वाढ होईल, असे अपेक्षित आहे. वरील प्रमाणे मार्केट विभागाने सादर केलेल्या प्रस्तावा मा. प्रशासक सर्वसाधरण सभा मंजूरी देत आहे. विभागाने निविदा प्रसिध्द करणे बाबत कार्यवाही करावी

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |